# पुणे विद्यापीठ

दुरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं.: - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे-४११००७
ई-मेल:- arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्रमांक:- आरक्षण/ओ-२२/६५३

दिनांक:- ०६/०६/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य / मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषय:- पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / संस्थामधील प्राचार्य / संचालक / शिक्षक पदांसाठी पात्र असलेल्या उमेदवारांच्या यादया घेण्यासंदर्भात.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये / संस्थांमध्ये, प्राचार्य / संचालक / शिक्षक पदांसाठी मागासवर्गीय पात्र उमेदवार उपलब्ध व्हावेत याकरिता पुणे विद्यापीठाची पदव्युतर परीक्षा उत्तीर्ण झालेले व सदर पदास लागणारी पात्रता धारण करीत असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांची या कार्यालयात नाव नोंदणी करण्यात येते. तरी आपण या कार्यालयाकडील तसेच सेवायोजन कार्यालय व इतर संबंधित कार्यालयाकडून पात्र उमेदवारांच्या यादया प्राप्त करून घेवून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाविद्यालये / संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता यादयांची मागणी करतांना या कार्यालयाकडून तपासून घेतलेले **आरक्षण प्रमाणपत्र-अ** व त्यानुसार **वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीचे** कात्रण मागणी पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. मागणी पत्रानुसार पात्र उमेदवारांच्या याद्या **ई-मेल** व्दारे पाठविण्यात येणार असल्याने मा.प्राचार्य / मा.संचालक यांनी महाविद्यालयाचा / संस्थेचा **ई-मेल आयडी** पत्रात स्पष्टपणे नमूद करावा, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

6/6/13

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

MMA/MD/Document/2013/Circular